प्रिय आईस,
दादा गेले नी तुला खूपच एकटे वाटायला लागले हे मला माहित आहे. पण काय करणार? आम्ही मुले नोकरीच्या ठिकाणी रजा किती घेणार? मुलगा सून नातू हे सर्व आपापल्या व्यवसायात. म्हणून तुझ्या साठी मी वृध्दाश्रमाचा मार्ग ठरविला आहे, त्याच्या साठी हा पत्र प्रपंच. तू हे पत्र वाचून आपला अभिप्राय मला दे वृध्दाश्रमाबद्दलची माझी मते तुला माहितच आहेत. पण प्रत्येक गोष्ठीला दोन बाजू असतात. मी दुस-या बाजूचा विचार करून हया निर्णयाप्रत आले की वृध्दाश्रम हा तुझ्यासाठी उत्तम पर्याय आहे कारण

1) समवयस्क लोक, तुझ्याच वयाच्या बायका
2) ज्यांना खेळांची आवड आहे (तुझ्यासारखी) पत्ते कॅरम बुध्दीबळे वगैरे बैठे खेळ
3) फिरायला जाणे (समवयस्कां बरोबर )
4) सुरक्षितता, घरात तुला एकटीला ठेवून जाणे धोक्याचे वाटते पैसेवाली वृध्दा एकटी आहे असे पाहून कोणीही घरात घुसेल. प्लंबर, विजदुरूस्ती वाला, फोन वाला वगैरे.
5) वृध्दा स्त्रिया व म्हातारपणाच्या गोष्टी जुळतील. सांधेदुखी, कमरदुखी, चालता न येणे हयावर डॉ ची व्यवस्था आश्रम करणार. तुझ्या वेळ चांगला जावा असे वाटते म्हणून हा सगळा घाट आहे. मी 3- 4 वृध्दाश्रम पाहिले आहेत. तुला वाटले तर एखादा पदार्थ सगळयांसाठी करणे कधी सर्वासाठी फळे आणणे संत्री मोसंबी चिकू वगैरे, सगळयांचे नाहीत पण आवडणा-या लोकांचे वाढदिवस साजरे करणे, हयांत तुझा वेळ छान जाईल. आता तू मुक्त आहेस. कुणाच ही बंधन नाही. स्वतंत्र विचार करू शकतेस. कुणीही अडवणार नाही. विचारापासून परावृत्त करणार नाही. त्यामुळी तुझा लौकर निर्णय कळव म्हणजे मला तशी व्यवस्था करता येईल

--- तुझी कन्या ---